# राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रधान सचिव (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मंत्रालयातील कार्यालयीन दालनात दिनांक २७.०९.२०१७ रोजी दुपारी ०३.३० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ह्यांच्या २६० व्या बैठकीचे इतिवृत्त पुढे नमुद केल्याप्रमाणे आहे :

सदर बैठकीस रा.प.प्रा. चे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

१. श्री. मनोज सौनिक, भा.प्र.से.
प्रधान सचिव (परिवहन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई
— अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण

२. डॉ. प्रवीण गेडाम, भा.प्र.से.
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
— सदस्य, राज्य परिवहन प्राधिकरण

३. श्री. आर.के.पद्मनाभन, भा.पो.से.
अपर पोलिस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
— सदस्य, राज्य परिवहन प्राधिकरण

४. श्री. स. बा. सहस्त्रबुध्दे
अपर परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
— सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण

**बाब क्रमांक :- १**

**विषय :- दिनांक १९.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई ह्यांच्या २५९ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक १९.०७.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २५९ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदर इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

**बाब क्रमांक :- २**

**विषय :-दिनांक १९.०७.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या २५९ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेणे.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दि. १९.०७.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण ह्यांच्या २५८ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेतला.

**बाब क्रमांक :- ०३**

**विषय मुंबई-पुणे या आंतरशहरी मार्गावर चालणाऱ्या परवानाधारकांना टॅक्सी मिटर बसवून स्थानिक व्यवसाय करण्यास परवानगी देणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी सदर विषयसुचीच्या टिपणीचे अवलोकन केले. सखोल चर्चेअंती राज्य परिवहन प्राधिकरणाचा ठराव क्र. २२/८१ चे पुर्नविलोकन करुन मुंबई-पुणे व मुंबई-नाशिक/शिर्डी या आंतरशहरी मार्गावर चालणाऱ्या परवानाधारकांना टॅक्सी मिटर बसवून स्थानिक व्यवसाय करण्यास मान्यता देऊन पुढील प्रमाणे निर्देश दिले.

१) सदर आंतरशहरी मार्गावर चालणाऱ्या परवानाधारकांच्या परवान्यावर संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी आपले क्षेत्र नमूद करावे.

२) स्थानिक व्यवसाय करताना संबंधित प्राधिकरणाने निश्चित केलेले भाडेदर आकारावे.

३) टॅक्सी मिटर बसवून स्थानिक व्यवसाय करण्यास परवानगी दिलेल्या टॅक्सींना इतर प्राधिकरणाच्या हद्दीत स्थानिक व्यवसाय करता येणार नाही.

४)मुंबई शहराबाहेरील मिटर टॅक्सींना मुंबई शहरात प्रवेश करावयाचा असल्यास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १७६२/१९९९ मध्ये दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.

तसेच, राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक २९.०४.२०१३ रोजीच्या बैठकितील ठराव क्र.०४/२०१३ मध्ये सदर मार्गावरील वाहनांची इंजिनक्षता १३०० सी.सी.पेक्षा जास्त असण्याच्या निर्णयात बदल करुन सदर टॅक्सींची इंजिनक्षमता ९८० सी.सी. पेक्षा कमी नसावी असा निर्णय घेतला.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २७.०९.२०१७ ठराव क्र.२४/२०१७)**

**बाब क्रमांक :- ०४**

**विषय राज्यातील सर्व भागांमध्ये ऑटोरिक्षा व टॅक्सी नवीन परवाने जारी करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेबाबत**

शासनाने अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०८१५/प्र.क्र.३८७/परि-२ दिनांक १७.०६.२०१७ अन्वये दि. २६.११.१९९७ च्या अधिसूचनेद्वारे राज्य परिवहन प्राधिकरण व प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांना ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांची संख्या मर्यादीत करण्याबाबत दिलेले निर्देश रद्द करण्याचा निर्णय घेऊन सदर अधिसूचना विखंडीत केली.

राज्यात तीन चाकी तीन आसनी ऑटोरिक्षा व टॅक्सी परवाने विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून जारी करण्याबाबत दिनांक १८.०७.२०१७ रोजी शासन निर्णय जारी केला.

तसेच महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.एमव्हीआर-०८१५/प्र.क्र.३८७/परि-दिनांक २२.०९.२०१७ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय जारी केला.

"ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांची संख्या मर्यादीत ठेवण्याबाबत राज्य परिवहन प्राधिकरणाद्वारे तसेच राज्यातील इतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी तीन चाकी तीन आसनी काळया-पिवळया ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या संख्येवर अथवा नव्याने परवाने जारी करण्यावर घातलेले निर्बंधाबाबतचे सर्व संबंधित ठराव रद्द करण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे खाजगी संवर्गात नोंदणी असणारी ऑटोरिक्षा नवीन परवान्यावर परिवहन संवर्गात नोंदणी करताना अथवा परवान्यावर बदली वाहन म्हणून परिवहन संवर्गात नोंदणी करताना शासनाने विहित केलेले अतिरिक्त परवाना शुल्क अदा करणे आवश्यक राहील. तसेच अशा खाजगी संवर्गात नोंदणी झालेली ऑटोरिक्षा परिवहन संवर्गात नोंदणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत राहील."

उपरोक्त शासन अधिसूचना, शासन निर्णय व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे राज्य परिवहन प्राधिकरणाने अवलोकन करुन त्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २७.०९.२०१७ ठराव क्र.२५/२०१७)**

**स.बा.सहस्त्रबुध्दे**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**डॉ. प्रवीण गेडाम,**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा,**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. आर.के.पद्मनाभन**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. मनोज सौनिक**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**